शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ५०/२०१८

| | |
|---|---|
| १. श्री. अशोककुमार बापूराव पाटील | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. प्राचार्य, मिरज महाविद्यालय, मिरज, जि.सांगली. <br> २. अध्यक्ष, यशवंत शिक्षण संस्था, सांगली, जि.सांगली. | वि. प |

**तक्रारीचे स्वरूप :**

यशवंत शिक्षण संस्था, सांगली, या संस्थेचे मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली यांचेकडील सहा.प्राध्यापक श्री. अशोककुमार बापूराव पाटील विषय संख्याशास्त्र यांनी दिनांक १०/१२/२०१७ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

मी मिरज महाविद्यालय, मिरज येथे संख्याशास्त्र विषयाचा सहा.प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. सदर महाविद्यालयात मी १५ जूलै १९९६ पासून सलग सेवेत आहे. त्या तारखेपासून मला शासन दराने देय असणारा घरभाडे भत्ता मिळत होता. मात्र माहे सप्टेंबर २०१५ पासून मला कोणतीही पूर्व सुचना न देता किंवा माझे कोणतेही मत विचारात न घेता परस्पर मा.प्राचार्यांनी मला घरभाडे भत्ता देण्याचे नाकारले आहे व तेवढी रक्कम माझ्या पगारातून कमी झाली आहे. शासन नियमानुसार मला घरभाडे भत्ता देय आहे. मी सदर महाविद्यालयाच्या कार्यस्थळी म्हणजेच मिरज येथे वास्तव करीत आहे. त्या बाबतचे लेखी पुरावे मा. प्राचार्यांना विनंती अर्जासोबत सादर करूनही त्यांनी मला घरभाडे भत्ता देण्यास नकार दिला. त्यामुळे सप्टेंबर २०१५ पासून सर्व थकीत व नियमित घरभाडे भत्ता तसेच थकीत घरभाडे भत्याच्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याज देणेबाबत संबधिताना आदेश होणेकामी ही तक्रार दाखल करणेत येत आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारदार शिक्षक श्री. ए.बी.पाटील हे महाविद्यालयाच्या ठिकाणापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या गव्हाण, ता. तासगाव या त्यांच्या मुळ गावी वास्तव्यास आहेत. शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानूसार घरभाडे भत्ता देय नसल्याने तो आदा करण्यात आला नाही. श्री. पाटील यांनी मालमत्ता खरेदी केलेल्याचा फक्त दस्तऐवज सादर केलेला आहे, परंतु मिरज शहरात वास्तव्याचा वैध पुरावा सादर केलेला नाही. सदर शिक्षक हे मिरज शहरात कधीही वास्तव्यास नव्हते व नाहीत.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्थेने आपल्या अभिप्रायामध्ये यशवंत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी समितीच्या दि. २५/११/२०१५ च्या बैठकीतील ठराव नं. ३ ची प्रत दाखल केली आहे.

आपल्या संस्थेच्या मिरज महाविद्यालय, मिरज या शाखेमध्ये काम करणारे श्री. अशोककुमार बापूराव पाटील व श्री. चंद्रकांत तमाण्णा मोरे हे शिक्षक महाविद्यालयाच्या ठिकाणी वास्तव्य करीत नाहीत असे या दोघांच्या गैरवर्तनासंबधी चौकशी करत असताना संस्थेच्या निदर्शनास आलेले आहे. श्री. पाटील हे मु.पो. गव्हाण, ता. तासगांव येथे वास्तव्यास आहेत तसेच श्री.मोरे हे मु.पो.खटाव, ता. मिरज येथे वास्तव्यास आहेत. गव्हाणे हे महाविद्यालय कार्यस्थळापासून साधारण ५० कि.मी. तर खटाव हे साधारण ४० कि. मी. अंतरावर आहे. श्री. पाटील व श्री. मोरे हे अनुक्रमे ५० कि.मी. व ४० कि.मी.अंतरावरून मिरजेस येतात व जातात. एवढया अंतरावरून महाविद्यालयामध्ये येवून अध्यापनाच्या कामाला योग्य न्याय देवू शकत नाहीत. तसेच एवढया अंतरावरून महाविद्यालयात येत असल्यामुळे महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) नियमानुसार उपस्थित राहणे व महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक कामामध्ये सहभागी होण्याचे टाळावे यासाठी शासनाच्या व संस्थेच्या आदेशानुसार महाविद्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहून महाविद्यालयात येताना व कामकाज संपवुन परत जाताना संगणकीय नोंदणी कार्ड प्रणाली (बायोमेट्रीक) चा वापर करण्यास त्यांनी नकार दिला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी संस्थेने त्यांच्या विरूध्द केलेल्या कायदेशीर कारवाईच्या विरोधात संस्थेची, महाविद्यालयाची व संस्थेचे

चेअरमन यांची बदनामी करणारी कृत्ये केली व आपल्या कामामध्ये कुचराई केली म्हणून त्यांचे गैरवर्तनाविरूध्द् चौकशी सुरू आहे.

श्री.पाटील व श्री.मोरे या दोघांनीही महाविद्यालयाच्या शहरात वास्तव्य केले पाहिजे व महाविद्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहुन महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक कामामध्ये सहभागी झाले पाहिजे यासाठी जोपर्यंत श्री. पाटील व श्री. मोरे हे महाविद्यालयाच्या कार्यस्थळावर म्हणजेच मिरज शहरात वास्तव्य करीत नाहीत व तसा पुराव्यानिशी संस्थेस कळवित नाहीत तोपर्यंत श्री.पाटील व श्री.मोरे या दोघांचेही घरभाडे भत्ता न देण्याचा निर्णय संस्थेने घेतला असुन त्यास ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने संस्था व महाविद्यालयातर्फे तोंडी म्हणणे मांडण्यात आले.

**समितीची निरिक्षणे :**

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार तसेच संस्थेचे संचालक व महाविद्यालयाचे प्राचार्य हजर होते. तक्रारदार यांचा घरभाडे भत्ता रोखण्याआधी संस्थेकडून तक्रारदारास कारणे दाखवा नोटीस देण्याबाबतची कार्यवाही झालेचे दिसून येत नाही. तसेच संस्था व महाविद्यालय यांचेकडून याबाबत समाधानकारक म्हणणे समितीसमोर आलेले नाही. तक्रारदार दिनांक १५ जूलै १९९८ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांना नियमानूसार घरभाडे भत्ता वेळोवेळी अदा करण्यात येत होता. परंतू सप्टेंबर २०१५ पासून तो रोखण्यात आला आहे. तो रोखण्यापूर्वी संस्था/महाविद्यालयाकडून आवश्यक ती कार्यवाही अवलंबलेचे दिसून येत नाही.

महाविद्यालयाच्या अभिप्रायामध्ये शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानूसार तक्रारदार यांना घरभाडे भत्ता देय नसल्याने तो अदा केला नाही असे नमूद आहे. तथापी महाविद्यालयाने सदर शासननिर्णय समितीसमोर दाखल केले नाहीत. तसेच घरभाडे भत्ता कपात ही कोणत्याही वस्तूस्थितीवर आधारित आहे असे समितीच्या निदर्शनास आणण्यात आलेले नाही.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

तक्रारदार यांनी समितीस तोंडी निवेदनात असेही सांगितले की, घरभाडे भत्ता कपात फक्त तक्रारदार शिक्षकांची रोखली आहे. महाविद्यालयातील अशा प्रकारच्या अन्य शिक्षकांची रोखलेली नाही. या बाबत प्राचार्य अथवा संस्था यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही.

तसेच एखाद्या कर्मचाऱ्याचा भत्ता रोखण्याबाबत कार्यवाही करताना त्याबाबत योग्य ती चौकशी होणे व कर्मचाऱ्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरून अपेक्षित आहे. तथापी या प्रकरणी तक्रारदाराबाबत अशी कोणतीही संधी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे संस्थेचा घरभाडे भत्ता रोखण्याचा आदेश एककल्ली व नैसर्गिक न्यायतत्वाची पायमल्ली करणारा आहे असे या समितीचे मत आहे व सर्व कागदत्रांचा व तोंडी म्हणण्याचा विचार केल्यावर हाच एकमेव निष्कर्ष निघतो की, संस्थेने तक्रारदाराचा सप्टेंबर २०१५ पासून घरभाडे रोखण्याचा दिलेला आदेश बेकायदेशीर आहे. करीता ही समिती खालील आदेश देत आहे.

## आदेश

संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदारास सप्टेंबर २०१५ पासून त्यास देय असलेला घरभाडे भत्ता नियमानूसार हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत आदा करावा. झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन कळविणेत यावे.

दिनांक : 28 FEB 2020

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)